


९० दिवसांमध्ये केली ५२२ कोटींची कर वसुली !

e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | बुधवार दिनांक 02/07/२०२५ | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 147 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# अधिक व्याजाचे आमिष देणाऱ्या योजनांविरोधात विशेष मोहीम - मुख्यमंत्री

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : राज्यात अधिक व्याजदराचे आमिष दाखवून नागरिकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या योजनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिस विभागामार्फत विशेष मोहीम राबविण्यात येत असून, नागरिकांनी अशा प्रकारच्या योजनांना बळी न पडता योग्य ती दक्षता घ्यावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केले.

याबाबत सदस्य भिमराव तापकीर यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य नाना पटोले, जितेंद्र आव्हाड यांनी उपप्रश्न विचारले.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नागरिकांनी गुंतवणूक करताना संबंधित संस्थेकडे आवश्यक परवाने, नोंदणी व अधिकृत मंजुरी आहेत की नाही, याची खातरजमा करावी. कोणतेही अतिरिक्त लाभाचे किंवा अधिक व्याजाचे आमिष दाखवणाऱ्या योजनांपासून दूर राहावे. अशा योजनांमार्फत फसवणुकीचे प्रकार घडू नयेत याकरिता 'फायनान्शियल इंटेलिजन्स युनिट' कार्यरत करण्यात आले असून, संबंधितांवर आवश्यक ती कारवाई करण्यात येत आहे.

टोरस कंपनीविरोधात आर्थिक फसवणुकीच्या प्रकरणी शासनाने कारवाई सुरू केली असून, मागील तीन महिन्यांपासून एमपीआयडी कायद्यान्वये कंपनीची मालमत्ता जप्त करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी यावेळी दिली

# मोदी तुमचा बाप असेल, शेतकऱ्यांचा नाही-नाना पटोले

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे व भाजपा आमदार बबनराव लोणीकर यांनी शेतकऱ्यांबाबत केलेली काही विधानं गेल्या काही दिवसांमध्ये वादग्रस्त ठरली होती. या विधानाचा संदर्भ देत नाना पटोलेंनी विधानसभेत संताप व्यक्त केला. तसेच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी याबद्दल सभागृहात माफी मागितली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. मात्र, त्यावेळी गोंधळ सुरू झाला."बबनराव लोणीकर व कृषीमंत्री माणिकराव कोकाटे शेतकऱ्यांचा सातत्याने अपमान करत आहेत. हा अपमान अन्नदाता सहन करणार नाही. मुख्यमंत्र्यांनी सभागृहात शेतकऱ्यांची माफी मागितली पाहिजे. मोदी तुमचा बाप असेल, शेतकऱ्यांचा बाप होऊ शकत नाही", असं नाना पटोले म्हणाले.दरम्यान, यावर असंसदीय शब्दांचा उल्लेख केल्याबद्दल विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांनी नाना पटोलेंना समज दिली. पण तेव्हाच नाना पटोले अध्यक्षांच्या खुर्चीजवळ जाऊन तावातावाने बोलू लागले. यानंतर ५ मिनिटांसाठी सभागृह स्थगित करण्यात आलं. त्यानंतर कामकाज सुरू झाल्यावर विरोधकांनी "माफी मागा, माफी मागा, शेतकऱ्यांची माफी मागा", अशा घोषणा द्यायला सुरुवात केली.



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
बुधवार दिनांक 02/07/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# 9.61 कोटींच्या थकबाकीची वसुली लवकरच

## आ. शंकर जगताप यांनी विधानसभेत एसटी डिजिटल जाहिरात घोटाळा प्रकरणी विचारला जाब

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



चिंचवड : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी महामंडळ) जागांवर होर्डिंग व डिजिटल जाहिराती देताना नियमबाह्य पद्धतीने परवाना देण्यात आल्याचा गंभीर प्रकार उघड झाला आहे. या संदर्भातील ओपो ट्रेडिंग जाहिरात परवाना घोटाळ्याचा मुद्दा आमदार शंकर जगताप (चिंचवड) यांनी विधानसभेत उपस्थित केला. त्यावर उत्तर देताना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दोषींवर कठोर कारवाई व काळ्या यादीत टाकण्याचे आश्वासन दिले.

टेकसिद्धी ॲडव्हर्ट प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला २३ मार्च २०२४ ते २२ फेब्रुवारी २०२९ या कालावधीसाठी एसटीच्या जागांवर जाहिरात लावण्याचा परवाना देण्यात आला होता. यासाठी कंपनीने वार्षिक १२ कोटी २२ लाख २० हजार रुपये (GST वगळून) भाडे भरायचे होते. तथापि, मे २०२४ ते डिसेंबर २०२४ या कालावधीत कंपनीने कोणतेही मासिक भाडे भरले नाही, परिणामी एसटी महामंडळाचे ९ कोटी ६१ लाख ४६ हजार रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.


मंत्री सरनाईक यांनी विधानसभेत उत्तर देताना मान्य केले की, संबंधित कंपनीने कराराच्या अटींचा भंग केला असून, सध्या सव्याज थकबाकी वसुलीची प्रक्रिया सुरू आहे. यासोबतच कंपनीला देण्यात आलेले डिजिटल जाहिरातीचे अधिकारही रद्द करण्यात आले आहेत.या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, घाटकोपर येथील मोठ्या होर्डिंग दुर्घटनेनंतर शासनाने परिपत्रक काढून सर्व होर्डिंग्जसाठी स्ट्रक्चरल ऑडिट बंधनकारक केले होते. त्यामुळे काही जाहिरातींना परवानगी नाकारण्यात आली. तसेच कोविडनंतरच्या कालावधीत जाहिरात व्यवसायावरही परिणाम झाला. मात्र, जाहिरातदार कंपनीने न केवळ भाडे थकवले, तर त्यावर कोणतेही समाधानकारक उत्तरही दिलेले नाही.

सध्या ९ कोटी ६१ लाखांची थकबाकी वसूल करण्याची प्रक्रिया सुरू असून, जर कंपनीने रक्कम अदा केली नाही, तर ९ कोटी रुपयांची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल, असे स्पष्ट करत सरनाईक यांनी सूचित केले की, दोष सिद्ध झाल्यास संबंधित जाहिरातदाराला काळ्या यादीत टाकले जाईल.या प्रकरणामुळे एसटी महामंडळातील निविदा प्रक्रिया आणि परवाना प्रणालीतील पारदर्शकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आमदार शंकर जगताप यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांच्या पार्श्वभूमीवर या प्रकाराकडे शासन गांभीर्याने पाहत असून, लवकरच दोषींवर निर्णायक कारवाई होईल, असे संकेत परिवहन मंत्र्यांनी दिले.

# नदी सुधार प्रकल्प राबविण्यासाठी पर्यावरण कमिटीची मान्यता द्या - संदीप वाघेरे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड शहरातून वाहणाऱ्या पवना, इंद्रायणी व मुळा नदीच्या प्रदुषणाचा विषय दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. याकरिता पवना व इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प राबविण्यासाठी “पर्यावरण ना-हरकत दाखला व आवश्यक असलेला निधी मिळावा याकरिता सातत्याने प्रयत्न करीत असून शहरातील इंद्रायणी नदीस काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण कमिटी मार्फत पर्यावरण ना हरकत दाखला मिळालेला असून पवना नदी दाखला मिळणे, अद्यापदेखील बाकी आहे.सद्यस्थितीला होत असलेल्या पावसाळी अधिवेशना दरम्यान महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण कमिटीची मान्यता ( पर्यावरण ना हरकत दाखला ) व प्रकल्पास निधी उपलब्ध करून देण्यात यावा असे निवेदन भाजपचे मा.नगरसेवक



संदीप वाघेरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे केली आहे. वाघेरे यांनी दिलेल्या निवेदनामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने पुढाकार घेत दोन्ही नद्यांना मोकळा श्वास घेण्यासाठी अपेक्षित उपाययोजनांची चाचपणी करण्यासाठी मे. एचसीपी डिझाईन प्लनिंग मॅनेजमेंट प्रा.लि. या सल्लागाराची सन २०१८ साली नेमणूक करण्यात आली होती. सल्लागाराच्या वतीने पवना व इंद्रायणी नदीकाठच्या विविध ठिकाणची पाहणी करून नदीपात्रामध्ये मिसळणारे सांडपाणी, बांधकामाचा राडारोडा टाकून केले जाणारे अनधिकृत भराव व त्यामुळे अरुंद होणारे नदीपात्र याबाबत नदीच्या दोन्ही काठावर असणाऱ्या खाजगी व सहकारी जमीनच सर्व्हे करून त्याचे संपूर्ण रेकॉर्ड बाबत संपूर्ण माहिती तयार करण्यात आलेली आहे. प्रकल्पासाठी २ मे २०१२ प्राथमिक प्रकल्प अहवाल तयार केंद्र सरकारच्या राष्ट्रीय नदी संरक्षण संचालनालयाकडे (एनआरसीडी) अनुदान मंजुरीसाठी सादर करण्यात आला होता त्यानंतर,14 ऑगस्ट २०१३ मध्ये महापालिकेने सुधारित प्राथमिक प्रकल्प अहवाल तयार करून राज्य सरकारला सादर केला. राज्य सरकारने संबंधित प्रकल्पाचा प्राथमिक अहवाल केंद्र सरकारच्या - वन आणि पर्यावरण मंत्रालयांतर्गत "एनआरसीडी कडे 2 डिसेंबर 2014 मध्ये मंजुरीसाठी पाठविला. राष्ट्रीय नदी संरक्षण योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार नदी प्रदुषण रोखण्याच्या बाबींना प्राधान्य देऊन प्राथमिक प्रकल्प अहवालाचे फेरसादरीकरण करण्याचे पत्र "एनआरसीडी' ने 10 एप्रिल 2015 त्या महापालिकेला पाठविले.

पवना आणि इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प राबविण्यासाठी महापालिकेतर्फे दोन्ही नदीपात्रांचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आलेले असून त्याच्या आधारावर प्रकल्पासाठी नव्याने विस्तृत प्रकल्प अहवाल तयार केला असून पवना नदी सुधार प्रकल्पासाठी सुमारे १५०० कोटी व इंद्रायणी नदी सुधारसाठी सुमारे १२०० कोटी खर्च येणार आहे.त्यानुसार दोन्ही नदीकारिता केंद्र शासन व राज्य शासन कडून सुमारे २७०० कोटी निधी मिळणे अत्यंत आवश्यक आहे.पिंपरी चिंचवड महापालिकेचा नदी सुधार प्रकल्प गेली १२ वर्ष रखडलेल्या अवस्थेमध्ये आहे. सद्यस्थितीला होत असलेल्या पावसाळी अधिवेशना दरम्यान आपण महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण कमिटीची मान्यता ( पर्यावरण ना हरकत दाखला ) व प्रकल्पास निधी उपलब्ध करून दिल्यास शहरातील एक महत्वपूर्ण प्रकल्प मार्गी लागणार असून शहरातील नद्यांना पूर्व स्थितीत आणण्यास मोलाचे सहकार्य लाभणार आहे. आपण पिंपरी चिंचवड शहरातील पवना नदीस महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण कमिटीची मान्यता देत निधी मंजूर करीत शहरातील महत्वपूर्ण प्रकल्प मार्गी लावावा अशी विनंती वाघेरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे केली आहे.

# महापालिकेच्या सेवेतून अधिकारी,कर्मचारी असे 61 जण सेवानिवृत्त

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : महापालिका सेवेतून निवृत्त होणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी आपल्या कार्यकाळात त्यांना सोपविलेली कामे व कर्तव्ये जबाबदारीने व प्रामाणिकपणे पार पाडली असून सहका-यांशी सौजन्य व सहकार्याने अनेक वर्ष सेवा केली आहे.सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांची आरोग्याची काळजी घ्यावी, निरोगी आणि आनंदी जीवन जगावे तसेच आपल्या कुटुंबीयांना वेळ द्यावा, असे प्रतिपादन सह आयुक्त मनोज लोणकर यांनी केले तसेच त्यांनी त्यांच्या पुढील आनंदी व आरोग्यदायी जीवनासाठी शुभेच्छा देखील दिल्या.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने संत तुकाराम नगर येथील आचार्य अत्रे रंगमंदिर येथे माहे जून २०२५ अखेर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणाऱ्या ५१ तर स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या १० अशा एकूण ६१ कर्मचाऱ्यांचा सह आयुक्त मनोज लोणकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला, त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.




या कार्यक्रमास उप आयुक्त संदीप खोत, राजेश आगळे, मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, कर्मचारी महासंघाचे मनोज माचरे,महादेव बोत्रे, नथा माथेरे, मंगेश कलापुरे तसेच महापालिका कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे नातेवाईक उपस्थित होते.

माहे मे २०२५ मध्ये नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या कर्मचाऱ्यांमध्ये सहशहर अभियंता नितीन देशमुख, कार्यकारी अभियंता नितीन निंबाळकर, सहाय्यक आयुक्त नाना मोरे, मुख्याध्यापक वैशाली तवटे, हमीदा मोमीन, संभाजी बामणे, असिस्टंट मेट्रन किरण गायकवाड, कार्यालय अधिक्षक प्रमोद सावरकर, आनंदा सातपुते, ढवळू मुंढे, लेखापाल राजश्री नेवासकर, मुख्य लिपिक विजय जाधव, प्रमोद निकम, सिस्टर इन्चार्ज मिनहाज सय्यद, विजया रोडे, नंदा गायकवाड, उपशिक्षक श्रद्धा जोशी, अरूणा नलवडे, उज्वला मरळे, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक भिमराव चौधरी, वैजनाथ पांढरे, फिटर लक्ष्मण वायदंडे, वायरमन यशवंत जगताप, वायरलेस ऑपरेटर भगवान कांबळे, ऑपरेटर गोरखनाथ जराड, वॉर्ड बॉय सखाराम मोरे, रखवालदार अर्जुनन गणेशन, सुभाष साळुंके, पंढरीनाथ चौरे, शिपाई मोहन बहिरट, मजूर सुरेश बोडके, अशोक सातपुते, शिवाजी कुसाळकर, राजेंद्र ढोरे, पंढरीनाथ बारणे, मधुकर ठोंबरे, जयंत वाघेरे, दत्तात्रय मिसाळ, बाजीराव मासुळकर, मुकादम उत्तम गवळी, एकनाथ शेळकंदे, नाईक राजू बोरकर, सफाई कामगार राजकुमार जाधव, मंदा भुजबळ, सफाई सेवक विनोद सपकाळ, मेघनाथ सारसर, कचरा कुली अरूण लोंढे, गटरकुली मोहन मंजाळ, बाळू गायकवाड, भाऊसाहेब रोकडे, करिम शेख यांचा समावेश आहे. तर स्वेछानिवृत्ती घेणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये सफाई सेवक उत्तम त्रिभुवन, माया वाल्मिकी, संदिप लांडगे, शिरीष गायकवाड, कचरा कुली कैलास जगताप, अंबादास जाधव, गटरकुली मंजाळ शेट्टी, अनिल विटकर, वसंत चव्हाण, कचरा कुली बबन सांगळे यांचा समावेश आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमोद जगताप यांनी तर सूत्रसंचालन आणि उपस्थितांचे आभार प्रफुल्ल पुराणिक यांनी मानले.

# दिवाळी अंक म्हणजे मराठी संस्कृतीचा अविभाज्य घटक - डॉ.सदानंद मोरे

## पहिल्या छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक प्रदर्शनाचे उद्घाटन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे: "महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवात भर घालण्याचे काम दिवाळी अंकांनी केले आहे. मन आणि मेंदूला बौद्धिक फराळ देऊन मानसिक स्वास्थ्य चांगले ठेवण्यासाठी दिवाळी अंक उपयुक्त ठरतात. खऱ्या अर्थाने दिवाळी अंक म्हणजे मराठी संस्कृतीचा अविभाग्य घटक आहे," असे प्रतिपादन संत साहित्याचे अभ्यासक व माजी संमेलनाध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांनी केले.

दिनमार्क पब्लिकेशनच्या वतीने बालगंधर्व रंगमंदिराच्या कलादालनात आयोजित स्वर्गवासी कमलाबाई रसिकलाल धारिवाल पुरस्कृत छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते झाले. प्रसंगी माजी संमेलनाध्यक्ष डॉ. भारत सासणे, साहित्यिक व परीक्षक माधव राजगुरू, संयोजक दिनकर शिलेदार आदी उपस्थित होते. हे प्रदर्शन येत्या शुक्रवारपर्यंत सकाळी ११ ते रात्री ८ या वेळेत सर्वांसाठी विनामूल्य खुले राहणार आहे.



डॉ. सदानंद मोरे म्हणाले, "संत ज्ञानेश्वर महाराजांनीही दिवाळीतील अक्षर फराळाचा उल्लेख करताना ज्ञानाची दिवाळी, असे म्हटले आहे. महाराष्ट्रातील दिवाळी अंकांना शंभरहून अधिक वर्षांची परंपरा आहे. मध्यमवर्गीय माणसाने दिवाळी अंकांना जीवित ठेवण्याचे काम केले. स्पर्धेच्या काळात काही अंक अल्पायुषी ठरले, तर काहींनी तग धरून हा वारसा जपला. दिवाळी अंकांचे स्वरूप दिवसेंदिवस बदलत गेले. आजघडीला चारशेहून अधिक अंक प्रकाशित होतात. ज्ञान आणि मनोरंजनाचे ध्येय गाठताना अप्रतिम मुखपृष्ठ, चित्रे, आशय संपन्नता, विषयांतील वैविध्यता मराठी वाचकांना समृद्ध करणारी आहे. एवढेच नाही, तर दिवाळी अंकांनी अनेक लेखक, साहित्यिक घडवले आहेत." भारत सासणे म्हणाले, "दिवाळी अंकांची ही परंपरा आंतरराष्ट्रीय स्तरावर गेली असून, मराठी व बंगाली भाषेत विशेष अंक निघतात. अनेक आव्हानावर मात करून ही परंपरा जाणाऱ्या संपादकांना प्रोत्साहन देणारा हा उपक्रम आहे. अंकांची संख्या वाढतेय, याचा आनंद आहे."

माधव राजगुरू म्हणाले की, अडीचशे तीनशे अंक वाचून समृद्ध झालो. वैविध्यपूर्ण आशय, मांडणी, संकल्पना अशा विविधतेने नटलेले हे अंक आहेत. ही स्पर्धा लेखकांना घडविणारी आहे. विविध प्रांतातील, भाषेतील, समाजातील हे अंक भारावून टाकणारे आहेत." प्रास्ताविकात दिनकर शिलेदार म्हणाले, "या प्रदर्शनात २३५ दिवाळी अंक आहेत. वैविध्यपूर्ण दिवाळी अंकांचे सादरीकरण एकाच छताखाली व्हावे, या उद्देशाने हे प्रदर्शन महत्त्वपूर्ण आहे. दिवाळी अंकांची यशस्वी परंपरा जपण्यासह त्यांना प्रोत्साहन देणारे हे प्रदर्शन आहे." अन्वय बेंद्रे यांनी सूत्रसंचालन केले.

# बाह्यवळण मार्गावर प्रवाशाला लुटणाऱ्या चोरट्यास अटक !

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावर एका प्रवाशाला धमकावून लुटणाऱ्या मोटारचालकासह साथीदाराला सिंहगड रस्ता पोलिसांनी गजाआड केले. चोरट्यांकडून गुन्हा करण्यासाठी वापरलेली मोटार आणि मोबाइल संच असा चार लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. निखील अरविंद पवार (वय २७, रा. मातोश्रीनगर, आंबेगाव बुद्रुक, कात्रज), रोहन शाम पवार (वय २७, रा. नऱ्हे) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसा, ३० मे रोजी रात्री



तक्रारदार तरुण मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावर बसची वाट पाहत थांबला होता. तो कोल्हापूरला निघाला होता. त्या वेळी आरोपी पवार हे मोटारीतून तेथे आले. त्यांनी तरुणाला कोल्हापूरला सोडतो, अशी बतावणी केली. त्यानंतर धावत्या मोटारीत पवार आणि साथीदारांनी तरुणाला शस्त्राचा धाक दाखविला.तरुणाला मारहाण करुन त्याच्याकडील रोकड, मोबाइल संच, सोनसाखळी असा मुद्देमाल लुटून आरोपी पवार पसार झाले. याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. पसार झालेल्या चोरट्यांचा माग काढण्यासाठी पोलिसांनी सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले होते.प्रवासी तरुणाला लुटणारा चोरटा नऱ्हे भागातील भूमकर चौकात थांबल्याची माहिती तपास पथकातील पोलीस कर्मचारी देवा चव्हाण, सागर शेडगे, निलेश भोरडे यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी निखील पवारला सापळा लावून ताब्यात घेतले. चौकशीत साथीदार रोहन पवार याचे नाव समजले. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने त्याला ताब्यात घेतले.पोलीस उपायुक्त संभाजी कदम, सहायक आयुक्त अजय परमार यांच्या मार्गदर्शनाखाली सिंहगड रस्ता पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप दाईंगडे, गुन्हे शाखेचे निरीक्षक उत्तम भजनावळे, उपनिरीक्षक संतोष भांडवलकर, संजय शिंदे, उत्तम तारू, अण्णा केकाण, विकास बांदल, राहुल ओलेकर, गणेश झगडे, विनायक मोहिते, सतीश मोरे, संदीप कांबळे, तानाजी सागर, समीर माळवदकर, शिरीष गावडे यांनी ही कारवाई केली.

# 90 दिवसांमध्ये केली 522 कोटींची कर वसुली!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या पहिल्या तिमाहीमध्ये म्हणजेच अवघ्या ९० दिवसांमध्ये तब्बल ५२२ कोटी ७२ लाख रुपयांचा मालमत्ता कर वसूल केला आहे. महापालिकेच्या इतिहासात प्रथमच पहिल्या तिमाहीत कर वसुलीचा पाचशे कोटींचा आकडा पार करून ऐतिहासिक कामगिरी महापालिकेने केली आहे. पहिल्या तिमाहीत नागरिकांनी जास्तीतजास्त मालमत्ता कर भरावा, यासाठी कर संकलन विभागाने ३० जून २०२५ पर्यंत विविध सवलती जाहीर केल्या होत्या. या सवलतींना भरभरून प्रतिसाद दिल्यामुळे शहरातील नागरिकांचे महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी आभार मानले आहेत.

पिंपरी चिंचवड महापालिकेने आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये ९६६ कोटींची मालमत्ता कर वसुली केली होती. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये हा




आकडा पार करण्यासाठी महापालिकेने सुरुवातीपासून नियोजन केले आहे. पहिल्या तिमाहीमध्येच जास्तीतजास्त कर वसूल व्हावा, यासाठी ३० जून २०२५ पर्यंत ऑनलाइन कर भरणाऱ्यांना सामान्य करावर १० टक्के सवलत देण्यासह विविध सवलती महापालिकेने जाहीर केल्या होत्या. या सवलतींना नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. १ एप्रिल २०२५ ते ३० जून २०२५ या आर्थिक वर्षाच्या पहिल्याच तिमाहीत तब्बल ४ लाख १२ हजार मालमत्ताधारकांनी कर भरून विविध सवलतींचा लाभ घेतला आहे. आर्थिक वर्ष २०२१-२२ ते आर्थिक वर्ष २०२५-२६ या पाच आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत होणाऱ्या कर संकलनाची आकडेवारी पाहता यंदाच्या वर्षी पहिल्या तिमाहीत कर संकलनात विक्रमी वाढ दिसून आली आहे. आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये पहिल्या तिमाहीत १७१.८५ कोटी रुपये, आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये २५३.६५ कोटी रुपये, आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये पहिल्या तिमाहीत ४५४ कोटी रुपये तर २०२४-२५ मध्ये पहिल्या तिमाहीत ४४० कोटी रुपयांची कर वसुली झाली होती. यंदा मात्र ३० जून २०२५ पर्यंत ५२२ कोटी ७२ लाखांची वसुली झाली आहे. महापालिकेच्या आवाहनाला प्रतिसाद देताना ३ लाख २३ हजार २३९ नागरिकांनी तब्बल ३८० कोटींपेक्षा जास्त कर ऑनलाइन पद्धतीने भरला आहे. ही संख्या जवळपास एकूण कर भरणाऱ्यांच्या तुलनेत ७३ टक्के आहे. १८ विभागीय कार्यालयांच्या कॅश काऊंटरद्वारे तब्बल ३० कोटी ६३ लाख रुपयांचा कर भरणा केला आहे. ३० जून २०२५ या एका दिवसात ३४ कोटी ४९ लाख रुपयांचा भरणा झाला.

पहिल्या तिमाहीत ऑनलाइनद्वारे ३८० कोटी ४८ लाख रुपये, रोख स्वरुपात ३० कोटी ६३ लाख, धनादेशाद्वारे २३ कोटी ६६ लाख आरटीजीएसद्वारे २३ कोटी ५३ लाख मालमत्ता भरण्यात आला आहे. सीएचडीसी प्रकल्पामुळे कर आकारणीमध्ये सुलभता, पारदर्शकता आणि गतिमानता आणणे सहज शक्य झाले. याद्वारे करवसुली, थकबाकीदारांच्या माहितीचे विश्लेषण होऊन वस्तुस्थिती समोर आली.

करसंकलन विभागाने 'डेटा' विश्लेषण करून त्यानुसार एसएमएस, टेलिकॉलिंग, होर्डिंग, सोशल मीडियाच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर संकलन विभागाने केलेले नियोजन, सीएचडीसी प्रकल्प अंतर्गत डेटा विश्लेषण करून त्याआधारे विविध माध्यमातून केलेली जनजागृती मोहिम, बचत गटांमार्फत घरोघरी पोहोचवण्यात आलेली मालमत्ता करांची बिले, कर संकलन विभागाच्या विविध सवलतींना नागरिकांना दिलेला प्रतिसाद, यासर्वांमुळे यंदा आर्थिक वर्षाच्या पहिल्याच तिमाहीत ५२२ कोटींचा कर वसुलीचा टप्पा पार झाला आहे. ही कामगिरी करण्यासाठी महत्त्वाचे योगदान असणाऱ्या करदात्यांसह सर्व विभागीय अधिकारी, कर्मचारी, बचत गटातील महिला यांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. - शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968